राष्ट्रवादाचा बुलंद आवाज

# न्यूज डंका महाराष्ट्र

मुंबई । पुणे । नाशिक जिल्ह्यात एकाच वेळी वितरित होणारे दैनिक

मुख्य संपादक : दिनेश कानजी

मुंबई >> गुरुवार, ५ फेब्रुवारी २०२६ >> वर्ष ४ >> अंक २४५ >> पाने ४ >> किंमत ५ रुपये



## मुंबई पुणे संथगती मार्ग; टँकर उलटल्याने १८ तास वाहतूक रखडली



टीम न्यूज डंका महाराष्ट्र
newsdanka@gmail.com

मुंबई- पुणे द्रुतगती महामार्गावर गॅस टँकर उलटल्याने सुमारे १८ तास वाहतूक विस्कळीत झाली, ज्यामुळे १२ किलोमीटरपेक्षा जास्त लांबीची वाहतूक कोंडी झाली असून शेकडो वाहने रात्रभर अडकून पडली आहेत. मंगळवारी संध्याकाळी ५ वाजता रायगड जिल्ह्यातील खंडाळा घाट विभागात हा अपघात झाला. अत्यंत ज्वलनशील प्रोपीलीन वायू वाहून नेणाऱ्या टँकरचे उतारावर नियंत्रण सुटले आणि टँकर उलटला. त्यानंतर लगेचच, वाहनातून गॅस गळती सुरू झाली, ज्यामुळे अधिकाऱ्यांनी खबरदारी म्हणून मुंबईकडे जाणारा कॅरेज वे बंद केला.

गळती सुरूच असल्याने, परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल (एनडीआरएफ), राज्य आपत्ती प्रतिसाद दल (एसडीआरएफ) आणि भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड (बीपीसीएल) यांच्या आपत्कालीन प्रतिसाद पथकांना तैनात करण्यात आले. अधिकाऱ्यांनी सांगितले की, बुधवारी सकाळपर्यंत फक्त ५० टक्के गॅस सुरक्षितपणे सोडण्यात आला आहे आणि उर्वरित भार निष्क्रिय करण्याचे काम संध्याकाळ उशिरापर्यंत सुरू राहण्याची शक्यता आहे.

मुंबई आणि पुण्याला जोडणाऱ्या ९४.५ किमी लांबीच्या एक्सप्रेसवेच्या दोन्ही बाजूंनी दीर्घकाळ वाहतूक बंद पडल्याने वाहतूक ठप्प झाली. रात्रभर अपघातस्थळाजवळ वाहने उभी राहिली, ज्यामुळे महिला आणि मुलांसह प्रवाशांना अन्न, पाणी किंवा शौचालयाची सुविधा उपलब्ध झाली नाही.

>> पान...३ वर

### निशिकांत दुबेंच्या भाषणामुळे संतापले विरोधक

## पंतप्रधानांच्या भाषणापूर्वी विरोधी खासदारांनी घातला प्रचंड गोंधळ, सभागृह तहकूब



### सत्ताधारी बाकांजवळ थेट आमनेसामने

**या गोंधळादरम्यान, विरोधी पक्षातील काही महिला खासदार सत्ताधारी बाकांकडे सरकल्या आणि भाजप खासदार निशिकांत दुबे यांच्याशी त्यांची जोरदार शाब्दिक झटापट झाली. ज्योतिमणी आणि वर्षा गायकवाड यांच्यासह काही खासदार दुबेंकडे पुढे जाताना दिसल्या. त्यानंतर भाजपच्या महिला खासदारही त्यांच्या दिशेने आल्या आणि क्षणिक आमनेसामने संघर्ष निर्माण झाला. सभापतींनी कामकाज तहकूब केल्याची घोषणा केल्यानंतरही गोंधळ सुरूच राहिला. सूत्रांच्या माहितीनुसार, सभागृह तहकूब झाल्यानंतरही काँग्रेस व अन्य विरोधी पक्षांच्या महिला खासदारांनी पुन्हा सत्ताधारी बाकांकडे कूच केले, पंतप्रधानांच्या आसनाच्या मागील दोन रांगांपर्यंत त्या पोहोचल्या आणि दुबे यांच्या दिशेने पुढे गेल्या. केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव आणि इतर मंत्र्यांनी खासदारांना मागे हटण्याची विनंती केली; मात्र महिला खासदार पुढे सरकत राहिल्या. अखेर काँग्रेस खासदार दीपेंद्र हुड्डा यांनी हस्तक्षेप करून दोन्ही बाजूंच्या सदस्यांना आपल्या जागांवर परतण्याचे आवाहन केले.**

टीम न्यूज डंका महाराष्ट्र
newsdanka@gmail.com

बुधवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे संध्याकाळी ५ वाजता लोकसभेत भाषण होणार होते पण त्याआधी काही मिनिटे लोकसभेचे कामकाज तहकूब करण्यात आले. विरोधी पक्षांच्या खासदारांनी केलेल्या जोरदार घोषणाबाजीमुळे परिस्थिती चिघळली आणि सत्ताधारी बाकांजवळ थेट संघर्षाची स्थिती निर्माण झाल्यानंतर हा निर्णय घेण्यात आला. यावेळी सभागृहात तीव्र आरोप–प्रत्यारोप झाले.

राहुल गांधी यांनी दुसऱ्या दिवशीही आपल्या भाषणात चीनचा मुद्दा उपस्थित करत माजी लष्करप्रमुख मुकुंद नरवणे यांच्या पुस्तकाचे दाखले वाचून दाखविण्याचा प्रयत्न केला तेव्हा त्याला लोकसभा अध्यक्षांनी विरोध केला. मात्र यानंतर खासदार निशिकांत दुबे यांनी नेहरू आणि गांधी परिवारावरील काही पुस्तकांचे दाखले देऊन विरोधकांना चिमटे काढण्याचा प्रयत्न केला. त्यावरून मग विरोधक संतापले.

भाजप खासदार मनोज तिवारी यांनी आरोप केला की विरोधी पक्षातील काही महिला खासदार सभागृहाच्या वेलमध्ये उतरून पंतप्रधानांच्या आसनाजवळ गेल्या आणि वरिष्ठ मंत्र्यांनी वारंवार विनंती करूनही त्या आपल्या जागांवर परतल्या नाहीत. तिवारी यांच्या म्हणण्यानुसार, परिस्थिती नियंत्रणाबाहेर गेल्याने पंतप्रधान सभागृहात प्रवेश करू शकले नाहीत.

>> पान...३ वर

## ममता बॅनर्जी सर्वोच्च न्यायालयात बनल्या वकील

### एसआयआरविरोधात केला युक्तिवाद



**“बंगालच का? आसाम किंवा ईशान्येकडील इतर राज्ये का नाहीत? निवडणूक आयोग केवळ बंगाललाच लक्ष्य करून येथील जनतेवर बुलडोझर चालवत आहे,” असे त्या म्हणाल्या. नागरिकांचे लोकशाही हक्क वाचवण्यासाठी न्यायालयाने हस्तक्षेप करावा**

**- ममता बॅनर्जी**

टीम न्यूज डंका महाराष्ट्र
newsdanka@gmail.com

बुधवारी सत्ताधारी मुख्यमंत्री म्हणून अत्यंत दुर्मिळ पाऊल उचलत, पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी सर्वोच्च न्यायालयात सांगितले की राज्यातील सुरू असलेली मतदार यादींची विशेष सघन पुनरिक्षण प्रक्रिया (SIR) ही येऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकांआधी मुद्दाम त्यांच्या राज्यालाच लक्ष्य करण्यासाठी रचण्यात आली आहे. या प्रक्रियेच्या दबावामुळे १५० हून अधिक लोकांचा मृत्यू झाल्याचा दावा त्यांनी केला, त्यात मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांच्या (CEO) निर्देशांमुळे तीव्र तणावाखाली मृत्यू पावलेला एक बूथ लेव्हल अधिकारीही असल्याचे त्यांनी नमूद केले.

निवडणूक आयोगाशी सुरू असलेला वाद तीव्र करण्यासाठी तीन दिवसांपूर्वी राजधानीत दाखल झालेल्या तृणमूल काँग्रेसच्या प्रमुख ममता बॅनर्जी यांनी, पश्चिम बंगालमधील एसआयआर प्रक्रियेला आव्हान देणाऱ्या अनेक याचिकांवर सुनावणी घेणाऱ्या मुख्य न्यायाधीश सूर्यकांत तसेच न्यायमूर्ती जॉयमाल्या बागची आणि विपुल पंचोली यांच्या खंडपीठासमोर आपली बाजू मांडली.

>> पान...३ वर

## बलूचिस्तानवरुन पाकिस्तानचा ताबा सुटतोय?

टीम न्यूज डंका महाराष्ट्र
newsdanka@gmail.com

पाकिस्तानच्या अशांत बलूचिस्तान प्रांतातील परिस्थिती दिवसेंदिवस गंभीर होत चालली असून, खुद्द पाकिस्तानचे संरक्षणमंत्री ख्वाजा आसिफ यांनीच लष्कराचा ताबा कमी होत असल्याची कबुली दिली आहे. संसदेत बोलताना त्यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, सध्याच्या हिंसाचारामुळे आणि सततच्या हल्ल्यांमुळे पाकिस्तानी लष्कर कमकुवत झाले असून अनेक भागांवर प्रभावी नियंत्रण ठेवणे कठीण जात आहे.



बलूचिस्तान हा पाकिस्तानमधील सर्वात मोठा प्रांत आहे. भौगोलिकदृष्ट्या हा प्रदेश अतिशय विस्तीर्ण, डोंगराळ आणि दुर्गम आहे. त्यामुळे इथे सुरक्षा राखणे आधीपासूनच अवघड होते. मात्र गेल्या काही महिन्यांत बंडखोर गटांच्या कारवायांमध्ये मोठी वाढ झाल्यामुळे परिस्थिती आणखी बिघडली आहे.

ख्वाजा आसिफ यांच्या म्हणण्यानुसार, बलूचिस्तानमध्ये सक्रिय असलेले बंडखोर गट आता अधिक संघटित झाले आहेत. त्यांच्याकडे आधुनिक शस्त्रसामग्री, दळणवळणाची साधने आणि नियोजनबद्ध हल्ल्यांची क्षमता आहे.

>> पान...३ वर

### महाराष्ट्र विधान परिषदेच्या समितीने हजर राहण्यास सांगितले

## एकनाथ शिंदेंवरील टिप्पणीबद्दल कुणाल कामराला समन्स

टीम न्यूज डंका महाराष्ट्र
newsdanka@gmail.com

**विनोदी कलाकार कुणाल कामरा याच्या अडचणी पुन्हा एकदा वाढल्या आहेत. विधान परिषदेच्या समितीने कुणाल याला महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर आक्षेपार्ह विडंबनात्मक गाणे आणि टिप्पणी केल्याबद्दल समन्स बजावले आहे. सुनावणीसाठी समितीसमोर हजर राहण्यास सांगण्यात आले आहे.**



### कुणाल कामरा-एकनाथ शिंदे वाद काय आहे?

**मार्च २०२५ मध्ये कुणाल कामरा याने मुंबईत एक स्टँड- अप शो केला. त्यात त्याने “दिल तो पागल है” या गाण्याचे विडंबन केले आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना लक्ष्य केले. त्यांच्या विडंबनात्मक गाण्यात कामरा यांनी शिंदे यांना देशद्रोही म्हटले. यामुळे मोठा गोंधळ उडाला. शिवसेनेच्या युवा सेनेने चित्रीकरण झालेल्या स्टुडिओची तोडफोड केली. पोलिसांनी कामरा याच्याविरुद्ध खटले दाखल केले, परंतु त्याला उच्च न्यायालयातून दिलासा मिळाला. दरम्यान, ठाकरे गटाने त्याला पाठींबा दिला.**

बुधवार, ४ फेब्रुवारी रोजी महाराष्ट्र विधान परिषदेच्या विशेषाधिकार समितीने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याविरुद्ध अपमानास्पद टिप्पणी केल्याबद्दल विनोदी कलाकार कुणाल कामरा आणि ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे यांना सुनावणीसाठी बोलावले. विशेषाधिकार समितीचे अध्यक्ष भाजपचे प्रसाद लाड आहेत.

>> पान...३ वर